साहेब या चिखलाकडे पाहता का? लोकांना होणारा नाहक त्रास थांबवता का?
>>पान 2

गोपाळकाल्याने आषाढी यात्रेची सांगता, पालख्यांचा परतीचा प्रवास सुरु
>>पान 3

आमदार सिद्धार्थ खरात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सभागृहात आक्रमक
>>पान 4

सुविचार
दुसऱ्यांना आदराने वागवा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com  मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 299 ■ शुक्रवार, दि. 11 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



रिअल कपल प्रिया बापट आणि उमेश कामत आता 'बिन लग्नाची गोष्ट'मध्ये दिसणार रील कपल!
आतील पान

# नक्षल-माओवाद्यांना चाप लावणारे जनसुरक्षा विधेयक विधानसभेत मंजूर

## आवाजी मतदानाने विधेयक मंजूर, मुख्यमंत्र्यांनी मांडले होते पटलावर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :गेल्या अनेक दिवसांपासून वादात अडकलेलं जनसुरक्षा विधेयक गुरुवारी विधानसभेत मांडण्यात आलं. या विधेयकावर विरोधकांनी आक्षेप घेतल्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. या समितीचा अहवाल ९ जुलै रोजी विधानसभेत पटलावर ठेवण्यात आला होता. विरोधकांच्या आक्षेपानंतर या विधेयकात काहीसे बदल करण्यात आले आणि ते विधानसभेत मांडण्यात आलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः हे विधेयक मांडलं.**




विरोधकांनी सूचवलेले बदल आम्ही केले असून यावर आता सार्वमत झालं आहे. लोकशाही न मानणाऱ्या संघटनांना संविधानावर आधारित राज्य उलथवून टाकायचं आहे. त्यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठीच हा कायदा आणत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. राज्यात आधी पाच जिल्ह्यात असलेला नक्षलवाद आता दोन तालुक्यापुरता उरला आहे. तोही वर्षभरात संपणार आहे. त्यामुळे माओवाद्यांनी आता त्यांची धोरणं बदलली आहेत. शहरी भागातील तरुणांचे ब्रेन वॉश करून त्यांना व्यवस्थेच्या विरोधात उभं करायचं हे काम ते करत आहेत. त्यांच्यावर नियंत्रण आणण्यासाठी जनसुरक्षा विधेयक काम करेल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी स्पष्ट केलं.

विधेयकावर संयुक्त समिती

या विधेयकावर अनेक संघटनांनी आक्षेप घेतला होता. अखेर गुरुवारी हे विधेयक मांडण्यात आलं. दरम्यान जनसुरक्षा विधेयकाच्या वादानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंच्या अध्यक्षतेखाली संयुक्त समिती स्थापन केली. या समितीत सर्वपक्षीय २५ सदस्य आहेत. त्यामध्ये जितेंद्र आव्हाड, सतेज पाटील, जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, शशिकांत शिंदे, अजय चौधरी सदस्य आहेत.

तीन महत्त्वाचे बदल

जनसुरक्षा विधेयक संयुक्त समितीचा अहवाल माझ्याच्या हाती लागला. विरोधक आणि सामाजिक संघटनांच्या विरोधानंतर त्यामध्ये महत्त्वाचे बदल करण्यात आले. 'व्यक्ती आणि संघटना'ऐवजी 'कडव्या विचारांच्या तत्सम संघटना' असा शब्द त्यामध्ये नमूद करण्यात आला. या विधेयकाला १२ हजार ५०० सूचना, हरकती आल्या होत्या. त्याचा अभ्यास करुन मूळ विधेयकात तीन महत्त्वाचे बदल करण्यात आल्याची माहिती आहे.

# गणेशोत्सव महाराष्ट्र राज्याचा महोत्सव!

## मंत्री आशिष शेलार यांची घोषणा; गणेशोत्सवाच्या प्रचारासाठी सरकार कटिबद्ध असल्याची ग्वाही

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :**लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या १०० वर्षाहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला महाराष्ट्र राज्य महोत्सव म्हणून आज घोषित करण्यात आले. राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार यांनी ही घोषणा विधानसभेत केली. विधानसभेत निवेदन करताना मंत्री आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सव १८९३ साली लोकमान्य टिळकांनी सुरू केला, या उत्सवाची पार्श्र्वभूमी ही सामाजिक, राष्ट्रीय, स्वतंत्रता, स्वाभिमान, स्वभाषा या सगळ्यांशी संबंधित आहे. त्या पद्धतीनेच आज हा उत्सव देशभरात चालू आहे, महाराष्ट्राचा गौरव आणि अभिमान असावा असलेला आपला गणेशोत्सव आहे.

देशात नाहीतर जगात या गणेशोत्सवाची व्याप्ती, संस्कृती आणि प्रचार याबद्दल महाराष्ट्र सरकार कटीबद्ध राहील. काही लोकांनी वेगवेगळ्या कारणाने गणेशोत्सवाच्या सार्वजनिक परंपरेला कुठे ना कुठे परंपरागत गणेशोत्सव बाधा निर्माण करण्याचा प्रयत्न विविध न्यायालयात जरूर केला. पण मला या ठिकाणी मुद्दामहुन उल्लेख करायचाय हे महायुतीचं सरकार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात या




सगळ्या निर्बंधांना, आलेल्या स्पिड ब्रेकरला बाजूला करण्याचे काम अतिशय शीघ्रतेने केले. पीओपीच्या परंपरागत मुर्त्यांवर बंदी आणताना सीपीसीबीच्या गाईडलाईन्सचा तत्कालीन सरकारच्या काळातल्या सरकारने बाऊ केला गेला. त्यानंतर पीओपी मुर्त्यांच्या बाबतीमध्ये पर्यावरण पूरक अन्य पर्यायांना समोर ठेवून पीओपी पर्यावरणाला घातक आहे की नाही, या विषयावर सखोल अभ्यास करण्याची भूमिका आमच्या विभागाने घेतली. राजीव गांधी विज्ञान आयोगामार्फत काकोडकर समितीचा अहवाल घेतला. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादवजी यांनी संमती दिली आणि जे निर्बंध होते तेही बाजूला निघाले. न्यायालयाच्या निवाड्यानुसार पीओपी मुर्त्या बनवणे, डिस्प्ले करणे आणि विकणे यालाही परवानगी मिळाल्याचे आशिष शेलार यांनी सांगितले.

# शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांना धक्का, आयकर खात्याकडून नोटीस

**मुंबई/प्रतिनिधी :** महायुती सरकारमधील शिंदे गटाचे मंत्री संजय शिरसाट यांना आयकर विभागाची नोटीस आल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे. हा संजय शिरसाट आणि शिंदे गटासाठी मोठा धक्का मानला जात आहे. छत्रपती संभाजीनगरमधील व्हिटस् हॉटेलप्रकरणात संजय शिरसाट यांना आयकर विभागाची नोटीस आल्याचे समजते. संजय शिरसाट यांनी एका जाहीर कार्यक्रमात ही कबुली दिली. एमआयएमचे नेते इम्तियाज जलील यांनी केलेल्या तक्रारीनंतर शिरसाट यांच्याकडे आयकर खात्याची वक्रदृष्टी वळाल्याची शक्यता वर्तविली जात आहे.



तर आयकर विभागाकडून नोटीस आल्याची जाहीर कबुली संजय शिरसाट यांनी दिली आहे. छत्रपती संभाजीनगर येथील एका कार्यक्रमात संजय शिरसाट यांनी केलेले वक्तव्य सध्या चांगलेच चर्चेत आले आहे. आता यापुढे ब्लॅकचे पैसे चालणार नाहीत, असे विधान त्यांनी केले आहे. तसेच हे वक्तव्य माझ्यासाठीच असल्यासही देखील त्यांनी म्हटले आहे.

२०१९ साली निवडणुकीत तुमची संपत्ती इतकी होती तर २०२४ साली तुमची संपत्ती इतकी कशी झाली? असं विचारल्याचे देखील संजय शिरसाट यांनी म्हटले आहे. याबाबत त्यांना नऊ तारखेला खुलासा करण्याबाबत सांगितलं होतं, अशी माहिती देखील संजय शिरसाट यांनी दिली आहे. पैसे कमावणे सोपं आहे. मात्र ते वापरायचे कसे हे अवघड झाल्याचं देखील संजय शिरसाट यांनी म्हटले आहे.

दरम्यान, काही दिवसांपूर्वी छत्रपती संभाजीनगरच्या वेदांत म्हणजेच विट्स हॉटेलच्या लिलावावरून राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट आणि त्यांच्या मुलावर गंभीर आरोप करण्यात आले होते. संजय शिरसाट यांच्या मुलाने छत्रपती संभाजीनगरमधील विट्स हॉटेलच्या लिलाव प्रक्रियेत हॉटेलची बाजारभावानुसार किंमत ११० कोटी रुपये असतानाही, केवळ ६७ कोटी रुपयांत विकत घेतल्याचा आरोप केला जात होता. यानंतर संजय शिरसाट यांनी या टेंडर प्रक्रियेतून माघार घेतल्याचे जाहीर केले होते. मात्र, विरोधकांनी हा विषय लावून धरला होता. पावसाळी अधिवेशनात सभागृहात हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता.

# उद्धव-राज ठाकरेंनी एकत्र निवडणुका लढाव्या यासाठी लोकांचा दबाव : राऊत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या राजकीय वर्तुळात गेल्या काही दिवसांमध्ये मोठे फेरबदल झाल्याचं दिसून येत आहे. तब्बल २० वर्षांनतर मराठीच्या हक्कासाठी वेगळे झालेले दोन भाऊ एकत्र आले. त्यानंतर आता शिवसेना ठाकरे गट भाग असलेल्या इंडिया आघाडीचं भविष्य काय असेल अशा चर्चा होऊ लागल्या आहेत. या सर्व गोष्टींवरती आज शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी भाष्य केलं आहे. लोक असे विचारतात इंडिया आघाडीचे भविष्य काय? जेव्हा राज ठाकरे यांच्यासोबत उद्धव ठाकरे हे एकाच मंचावर गेले आणि महाराष्ट्रात एक प्रचंड जल्लोष झाला, त्याच्यानंतर अनेकांना प्रश्न्न पडला यापुढे महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीचे भविष्य काय? त्याच्यावर माझं उत्तर असं आहे, इंडिया आघाडी जे तुम्ही म्हणता हा लोकसभा निवडणुकांसाठी निर्माण झाली. आम्ही एकत्र निवडणुका लढल्या, आम्हाला चांगलं यश मिळालं. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर इंडिया ब्लॉकची एकही बैठक होऊ शकली नाही अशी खंत स्वतः शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सुद्धा व्यक्त केली. अनेक नेत्यांसमोर ही खंत व्यक्त केलेली आहे, असंही पुढे संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

इंडिया आघाडी विषय हा राष्ट्रीय विषयांवर पार्लमेंटरी, लोकसभा, राज्यसभा या संदर्भात आहे. महाविकास आघाडी स्थापन झाली. त्याच्यामध्ये तीन पक्ष प्रामुख्याने होते. शिवसेना, शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि काँग्रेस पक्ष ही महाराष्ट्र विधानसभेसाठी निर्माण झालेली आघाडी आम्ही एकत्र निवडणुका लढलो. आम्ही महाविकास आघाडीतून कोणीही बाहेर पडले नाही, आम्ही त्याचे घटक आहोत.



आजही महाविकास आघाडी संदर्भात निर्णय एकत्र घेतले जातील. आता विषय राहतो महानगरपालिकांचा, त्या संदर्भात आजही लोकांच्या मनात प्रश्न्न आहेत. महाविकास आघाडी किंवा इंडिया आघाडी या स्थानिक स्वराज्य संस्था एकत्र लढतील काय? त्यासाठी त्यांची स्थापना नाही, स्थानिक स्वराज्य संस्था खास करून महानगरपालिका जिल्हा परिषद नगरपंचायत यासाठी वेगळी गणित आणि समीकरणे असतात. त्यासाठी कधीतरी स्वतंत्रपणे लढावं लागतं. कधी स्थानिक आघाडी करावी लागते. मला जेव्हा प्रश्न्न विचारला तेव्हा मी इतकच सांगितलं आमच्या सगळ्यांवर जनतेचा दबाव आहे, जो आपण पाच तारखेला पाहिला असेल, मुंबई महानगरपालिका महाराष्ट्रातल्या महानगरपालिकांमध्ये शिवसेना आणि मनसे खास करून उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र निवडणुका लढाव्या हा लोकांचा दबाव या संदर्भात भविष्यात चर्चा होतील, त्यावरती फार चिंता करण्याचं काही कारण नाही, असंही पुढे खासदार संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

### ठाकरे हेच महाराष्ट्राच्या बाहेरुन आले; हिंदी-मराठीच्या वादावर शंकराचार्य अविमुक्तेश्वरांची पहिली प्रतिक्रिया

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात मराठीच्या मुद्द्यावरुन वाद पेटला असून तब्बल २० वर्षानंतर ठाकरे बंधू मराठीच्या मुद्द्यावरुन एकत्र आल्याचं पाहायला मिळालं. एकीकडे महापालिका निवडणुकांची तयारी सुरु असतानाच दुसरीकडे मराठीच्या मुद्द्यावरुन शिवसेना-मनसे एकत्र आल्याने मुंबईतील दोन्ही पक्षाचे कार्यकर्ते उत्साही आहेत. मात्र, मनसे कार्यकर्त्यांकडून मराठीच्या मुद्द्यावरुन होणाऱ्या मारहाणीवरुन अनेकांनी ठाकरेंच्या विरुद्ध भूमिका घेतली. भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी थेट मराठी जणांवर हल्लाबोल केला, तर भाजप नेत्यांनी ठाकरे बंधूंच्या मेळाव्यावर जोरदार टीका केली. आता, हिंदी-मराठीच्या वादात जगद्गुरु शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी आपली भूमिका मांडली आहे. विशेष म्हणजे ठाकरे बंधूंवर टीका करत, आपण मराठी शिकायला तयारी आहे, मी २ महिने मुंबईत आहे, त्यांनी मला मराठी शिकवावी, असेही शंकराचार्यांनी म्हटलं आहे. देशभरात आज गुरु पौर्णिमेचा उत्साह पाहायला मिळत असून गुरु जणांचे आशीर्वाद घेण्यासाठी शिष्य गर्दी करत आहेत. राजकीय गुरु असलेल्या ठाकरेंच्या बंगल्यावरही कार्यकर्ते गुरु पौर्णिमेनिमित्ताने गर्दी करताना दिसून येतात. दुसरीकडे गुरूपर्य शंकराचार्य यांच्या दर्शनासाठीही भाविक, शिष्यांनी मुंबईत गर्दी केली आहे.

# बुलडाणा शहरातील खराब रस्ते तात्काळ दुरुस्त करा -रविकांत तुपकर

➤ तुपकरांनी घेतली मुख्याधिकाऱ्यांची भेटन.प. प्रशासनाविरोधात तुपकर आक्रमक..आंदोलनाचा इशारा
➤ तेलगू नगर ते टिपू सुलतान चौक रस्ताही तात्काळ दुरुस्त करा

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** थंड हवेचे ठिकाण आणि जिल्ह्याचे मुख्यालय अशी ओळख असलेल्या बुलढाणा शहरात सध्या अनेक रस्त्यांची दुरावस्था झाली असून ठिकठिकाणी स्वच्छतेचा अभाव दिसून येत आहे. तेलगू नगर ते टिपू सुलतान चौक हाही रस्ता खड्डेमय झाला असून याबाबत नागरिकांच्या वाढत्या तक्रारी पाहता क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून आले. या संदर्भात त्यांनी आज १० जुलै रोजी नगरपालिकेचे मुख्याधिकारी गणेश पांडे यांची भेट घेऊन चर्चा केली तसेच वेळेत रस्त्यांची दुरुस्ती आणि स्वच्छता न झाल्यास आक्रमक आंदोलन करण्याचा इशारा देखील त्यांनी दिला.






बुलडाणा शहर जिल्ह्याचे मुख्यालय असून सर्व महत्त्वाचे अधिकारी, पदाधिकारी या शहरात राहतात. जिल्हाभरातील सर्वसामान्य नागरिक शेतकरी तसेच विद्यार्थी येथे शिक्षणासाठी देखील येतात. सध्या शहरातील अनेक रस्ते पावसामुळे उखडले असून रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. काही रस्ते चिखलमय झाले आहेत तर काही रस्त्यांचे गटारात रूपांतर झाले आहे. त्यामुळे अपघात होतायेत. काही महिला शाळकरी मुली आणि मुलांचा अपघात होऊन ते जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. शिवाय शहरातील स्वच्छतेचा देखील प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. याच प्रकारे शहरातील तेलगू नगर ते टिपू सुलतान चौक हा रस्ताही खूप खराब झाला असून त्यामध्ये खड्डे पडले आहेत, संपूर्ण रस्त्यावर पाणी साचून गटार तयार झाले आहे, चिखल आणि घाण पाणी साचल्याने नागरिकांच्या आरोग्याला धोका तयार झाला आहे या सर्व बाबी युवा नेते रविकांत तुपकर यांनी पालिकेचे मुख्याधिकारी गणेश पांडे यांच्या निदर्शनास आणून दिल्या. शहरातील विविध रस्त्यांची दैनंदिन अवस्था आणि अस्वच्छता याबाबत त्यांनी मुख्याधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. रस्त्याचे काम तात्काळ झाले नाही तर बुलडाणा न.प. प्रशासनासमोर आक्रमक आंदोलन छेडण्याचा इशारा देखील यावेळी न.प.मुख्याधिकाऱ्यांना दिला. यावेळी रविकांत तुपकर यांच्या सोबत शिष्टमंडळामध्ये ॲड राज शेख, दिलीप राजपूत, अतुल तायडे,मोहम्मद दानिश अजहर, मिर्जा नावेद, फरदीन लाला, नदीम शेख,नवाज मिर्जा, चंद्रशेखर देशमुख उपस्थित होते.

## लोकसंख्या शिक्षण काळाची गरज

आज ११ जुलै आजचा दिवस जगभर जागतिक लोकसंख्या दीन म्हणून साजरा केला जातो. ११ जुलै १९८७ रोजी जगात पाच अब्जावे बालक जन्माला आले तेंव्हापासून हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून पाळला जातो. १९८७ ते २०२१ म्हणजे अवघ्या चोवीस वर्षात जगाची लोकसंख्या दोन अब्जांनी वाढून ती सात कोटींपर्यंत पोहचली याचाच अर्थ जगाची लोकसंख्या तुफान वेगाने वाढत आहे. भारतात तर लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे. दोन वर्षापूर्वीच भारताने चीनला मागे सारून जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. दोन वर्षापूर्वीच तज्ज्ञांनी २०२३ साली भारत चीनला मागे सारून सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनेल असा अंदाज वर्तवला होता. दोन वर्षापूर्वी म्हणजे २०२३ च्या एप्रिल महिन्यात युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंट या जागतिक लोकसंख्येचा अभ्यास करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या संस्थेने त्याची पुष्टी केली आहे. युनायटेड नेशन्स पॉप्युलेशन फ्रंटने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारताची लोकसंख्या चिनपेक्षा जास्त असून भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. भारताची लोकसंख्या १,४२८.६ दशलक्ष आहे तर चीनची लोकसंख्या १,४२५.७ दशलक्ष इतकी आहे म्हणजेच दोन्ही देशांच्या लोकसंख्येमध्ये २.९ दशलक्ष इतका फरक आहे. या अहवालात चीनच्या लोकसंख्या वाढीचा वेग घटत आहे तर भारताचा लोकसंख्या वाढीचा वेग सर्वाधिक आहे असेही नमूद करण्यात आले आहे. आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या पुढे गेली आहे. देश स्वातंत्र्य झाला तेंव्हा आपली लोकसंख्या तीस कोटी होती याचाच अर्थ मागील पंच्याहत्तर वर्षात आपल्या देशातील लोकसंख्या ११० कोटींनी वाढली. आज आपण लोकसंख्येत जगात पहिल्या क्रमांकावर पोहचलो आहोत अर्थात ही काही भूषणावह बाब नाही. देशाच्या सर्व समस्यांचे मूळ हे वाढत्या लोकसंख्येतच आहे. झपाट्याने वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे देशात अन्न, वस्त्र, निवारा, रोगराई आणि दारिद्रय असे अनेक प्रश्न उदभवू लागले आहेत. विशेष म्हणजे देशाच्या प्रगतीत वाढती लोकसंख्या ही मोठा अडसर ठरत आहे. लोकसंख्या वाढीचा सर्व बाबींवर परिणाम होत असून विकासालाही खीळ बसत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशातील सर्व नागरिकांच्या मूलभूत गरजा भागवणेही सरकारला शक्य होत नाही. ही लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी शासनस्तरावरून पुरेसे प्रयत्नही केले जात आहेत. पण समाजातून अजूनही त्या प्रयत्नांना म्हणावी तशी साथ मिळत नाही. कुटुंब नियोजनाची मोहीम सरकारी पातळीवर प्रभावीपणे राबवली जात आहे ही दिलासा देणारी बाब असली तरी मुलगा व्हावा या हट्टापायी तीन ते चार अपत्यांना जन्म देणारे महाभागही समाजात आहेत. या आणि अशा लोकांमुळेच ही मोहीम वेग धरत नाही. लोकसंख्या नियंत्रणात आणायची असेल तर नव्या पिडीमध्ये लोकसंख्येविषयी योग्य दृष्टिकोन आणि जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे त्यासाठी नव्या पीडिला लोकसंख्या शिक्षण दिले पाहिजे. अवघ्या २४ वर्षात जगाची लोकसंख्या पाच अब्जानी वाढली तर देशाची लोकसंख्या पंच्याहत्तर वर्षात ११० कोटींनी वाढली या वेगाने जर लोकसंख्या वाढत राहिली तर लोकसंख्येचा हा भार वसुंधरा पेलू शकणार नाही त्याचा परिणाम एकूणच मानवी जीवनावर काय होईल हे नव्या पीडिला समजावून सांगावे लागेल. देशातील लोकसंख्या जर नियंत्रणात आली नाही तर सर्वानाच अडचणींचा सामना करावा लागेल. आपण जागतिक महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहोत. हे स्वप्न साकार करायचे असेल तर वाढत्या लोकसंख्येला आळा घालावाच लागेल हे नवीन पीडिला पटवून द्यावे लागेल. वाढत्या लोकसंख्येमुळे होणारे दुष्परिणाम, निर्माण होणाऱ्या समस्या याची विद्यार्थ्यांना माहिती व्हावी यासाठी शाळा, महाविद्यालयांमध्ये चर्चासत्रांचे आयोजन करून विद्यार्थ्यांचे प्रबोधन करायला हवे. लोकसंख्या शिक्षण अप्रत्यक्ष सामाजिक शिक्षण आहे त्यामुळे केवळ तरुणांनाच नव्हे तर समाजालाही या शिक्षणाची गरज आहे. लोकसंख्या शिक्षण ही काळाची गरज आहे. लोकसंख्या वाढ रोखायची असेल, देशाला विकासाच्या मार्गावर न्यायचे असेल आणि देशाला महासत्ता बनवायचे असेल तर लोकसंख्या शिक्षणाला पर्याय नाही.

# साहेब या चिखलाकडे पाहता का? लोकांना होणारा नाहक त्रास थांबवता का?

## फुबगाव येथील मुख्य रस्त्यावर पसरला चिखल राज

**दैनिक आपला विदर्भ**



**दारव्हा/प्रतिनिधी :** फुबगाव गावातील नेर व दारव्हा या प्रमुख दोन शहराला जोडणारा मुख्य रस्ता पूर्णतः चिखल युक्त झालेला आहे.

मागील महिन्यातच या रस्त्यावर ग्रामपंचायतने मुरूम टाकले होते. पण आलेल्या पावसाने मुरुमाचे रूपांतर दुर्गंधयुक्त चिखलात झाले, या चिखलाचा नाहक त्रास गावकऱ्यांना होत आहे. हा रस्ता मुख्य असल्याकारणाने रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होते. बऱ्याचदा या चिखलात गाडी घसरून अपघात सुद्धा झालेले आहे.

बऱ्याच वर्षांपासून हा रस्ता का बनत नाही हा प्रश्न गावकऱ्यांना पडतो आहे. या चीखलावर काही तरी उपाय करा अशी संतापाची लाट गावात उसळली आहे. या पसरलेल्या चिखलराज्यावर काय कार्यवाही होते हे बघावं लागणार आहे.

हा रस्ता दारव्हा व नेर या दोन शहराला जोडणारा मुख्य रस्ता आहे. बऱ्याच दिवसापासून या चिखलाचा त्रास लोकांना सहन करावा लागत आहे. येत्या सोमवार पर्यंत या चिखलावर काही कार्यवाही झाली नाही तर संबंधित कार्यालयात हा चिखल जमा करून मी स्वतः फेकणार आहे.

**–प्रनिल मनोहर जाधव**
**गावातील युवक**

## ऑनलाईन गेमचा मार्ग मुलांच्या आत्महत्यांपर्यंत

**नाशिक/प्रतिनिधी :** भ्रमणध्वनीवरील ऑनलाईन गेम खेळण्याचे वेड आता मुलांना आत्महत्येपर्यंत खेचू लागले आहे. नाशिकमध्ये घडलेल्या घटनेवरुन हेच दिसते. ऑनलाईन खेळण्यात सतत दंग राहणाऱ्या १६ वर्षीय मुलाने या खेळात पैसे हरल्याच्या अस्वस्थेतून रात्री घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघड झाल्याने पालकांमध्ये खळबळ उडाली आहे. स्राट भालेराव (१६) असे या मुलाचे नाव आहे. स्राटच्या वडिलांचे १३ वर्षापूर्वी निधन झाले होते. आई लहान मुलांना सांभाळण्याचे काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवते. स्राटला दोन बहिणी आहेत. मोठी बहीण अकरावीत तर, लहान इयत्ता नववीत शिक्षण घेते. स्राट घरातील एकुलता एक मुलगा होता. भविष्यात कुटुंबाची त्याच्यावर जबाबदारी होती. ऑनलाईन गेमच्या नादात कुटुंबाचा आधार गमावल्याची भावना नातेवाईकांनी व्यक्त केली.जयभवानी रस्त्यावरील डायमंड रो हाऊसमध्ये ही घटना घडली. स्राट हा वडनेर येथील केंद्रीय विद्यालयाचा विद्यार्थी होता. इयत्ता दहावीत दोन विषयात तो अनुत्तीर्ण झाला. उत्तरपत्रिका फेरपडताळणीसाठी त्याने अर्ज केल्याचे सांगितले जाते. १५ जुलै रोजी राहिलेल्या विषयांची तो परीक्षा देणार होता. तत्पुर्वीच भ्रमणध्वनीवरील ऑनलाईन गेमच्या नादात त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे कुटुंबियांकडून सांगण्यात आले. रात्री तो घरातील वरच्या मजल्यावर झोपण्यासाठी गेला. तिथे तो भ्रमणध्वनीवर ऑनलाईन गेम खेळत बसला. सकाळी काका ज्ञानेश्वर भालेराव हे त्याच्या खोलीत गेले असता स्राटने गळफास घेतल्याचे दिसले. कुटुंबियांनी स्राटला तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात नेले. परंतु, तत्पुर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले.

## चंद्रपूर जिल्ह्यातील मूल - मारोडा येथील कृषी महाविद्यालयासाठी जागा लवकरच देणार - कृषी मंत्री ॲड.माणिकराव कोकाटे

**मुंबई/प्रतिनिधी :**चंद्रपूर जिल्ह्यातील मूल– मारोडा येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत शासकीय कृषी महाविद्यालय मंजूर करण्यात आले आहे. त्यासाठी ३५ कोटी रुपयांचा निधीही देण्यात आला आहे. या इमारत बांधकामासाठी असलेली जागेची अडचण लवकरच सोडवण्यात येऊन येथे महाविद्यालयाचे बांधकाम करण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांनी विधानसभेत अर्धा तास चर्चेच्या उत्तरात दिली चंद्रपूर जिल्ह्यातील कृषी महाविद्यालयाबाबत सदस्य सुधीर मुनगंटीवार यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेमध्ये सदस्य नारायण कुचे यांनी सहभाग घेतला. कृषिमंत्री ॲड. कोकाटे म्हणाले, कृषी विभागाच्या आकृतीबंध निर्मितीची प्रक्रिया सुरू आहे. या नवीन कृषी महाविद्यालयासाठी पदभरती दोन महिन्यात करण्यात येईल. महाविद्यालयाला देण्यात येणाऱ्या जमिनीबाबत संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

## ‘अमृत’ संस्थेची प्रशिक्षण, अर्थसहाय्य योजना; जिल्ह्यातील युवकयुवतींनी योजनांचा लाभ घ्यावा

### विशेष कार्य अधिकारी सिद्धेश्वर वरणगावकर यांचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाची महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी अर्थात ‘अमृत’ संस्था व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने बुलढाणा जिल्ह्यातून खुल्या गटातील लाभार्थ्यांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने अमृत संस्थेचे विशेष कार्य अधिकारी सिद्धेश्वर वरणगावकर यांनी नुकतीच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांची भेट घेतली. जिल्ह्यातील अधिकाधिक युवक-युवतींनी अमृत संस्थेच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिद्धेश्वर वरणगावकर यांनी यावेळी केले.

यावेळी बुलढाणा जिल्हा व्यवस्थापक जिग्नेश क्रमाणी व मेहकर येथील नंदकिशोर मगर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने जिल्ह्यातील उद्योजकतेलाही चालना देण्याचा सकारात्मक विचार व्यक्त करण्यात आला. यावेळी त्यांनी प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांचीही भेट घेवून योजनांची पुस्तिका भेट दिली.

।योजना कोणत्या आहे ?

रोजगारक्षम कौशल्य विकासासाठी स्वयंरोजगार प्रशिक्षण योजना, कृषी उद्योग प्रशिक्षण योजना, ड्रोन ऑपरेटर रिमोट पायलट प्रशिक्षण योजना, आर्थिक साक्षरता प्रशिक्षण योजना आणि अमृत बेकरी प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहेत. औद्योगिक व उन्नत कौशल्य विकासासाठी तांत्रिक रोजगार प्रशिक्षण, माहिती तंत्रज्ञान आणि इलेक्ट्रॉनिक्स तथा उच्च कार्यक्षमता संगणक प्रशिक्षण, व्यवसाय किंवा उद्योग इंक्युबेशन योजना, अमृत कलश योजना राबविल्या जात आहेत.

स्पर्धा परीक्षा प्रोत्साहन

अर्थसहाय्यासाठी युपीएससी स्पर्धा परीक्षा नागरी सेवा/ वन सेवा/ अभियांत्रिकी सेवा परिक्षार्थींना अर्थसहाय्य दिले जाते.तसेच एमपीएससी स्पर्धा परीक्षा गट अ,ब च्या परीक्षार्थींना अर्थसहाय्य दिले जाते. उद्योजकांकरिता आर्थिक विकास योजनेंतर्गत वैयक्तिक व्याज परतावा योजना आणि परशुराम गट व्याज परतावा योजना राबविली जात आहे. शैक्षणिक अर्थयहाय्य योजनेंतर्गत एम्स, आयआयटी, आयआयएम, आयआयआयटी या संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य आणि शासकीय संगणक टंकलेखन व लघुलेखन परीक्षेसाठी अर्थसहाय्य दिले जात आहे.

व्यक्तिमत्व विकासांतर्गत किशोर विकास उपक्रम व अमृत कलश योजना राबविली जात आहे. बुलढाण्यातील युवकयुवतींनी अमृत संस्थेच्या योजना व प्रशिक्षणाच्या अधिक माहितीसाठी जिग्नेश क्रमाणी यांना ८३०८९९८९२२ मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अमृत योजनेच्या या महत्त्वाकांक्षी योजनांची जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील युवकयुवतींनी अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन अमृत संस्थेचे विशेष कार्य अधिकारी सिद्धेश्वर वरणगावकर यांनी केले आहे.

# अमरावती विद्यापीठ मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य डॉ राधेशाम सिकची यांनी दिली मॉडेल डिग्री कॉलेजला सदिच्छा भेट



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ द्वारा संचालित बुलढाणा येथील मॉडल डिग्री कॉलेजला अमरावती विद्यापीठ मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य डॉ राधेशाम सिकची यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली

मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ अण्णासाहेब म्हळसणे यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक कार्यक्रम आणि महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती यावेळी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मॅनेजमेंट कौन्सिल सदस्य डॉ राधेशाम सिकची यांना दिली नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी प्राध्यापकांची भूमिका ही महत्त्वाची असल्याच त्यांनी यावेळी त्यांनी नमूद केलं महाविद्यालयात प्राध्यापकांसोबत त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सुख सुविधे संदर्भात ही त्यांनी माहिती घेतली यावेळी मॉडेल डिग्री कॉलेज येथील प्राध्यापक प्राध्यापक इतर कर्मचारी उपस्थित होते .

# मनसेचा ‘कोरा ७/१२’ यात्रेला पाठिंबा

## लाखखिंड येथील सभेत व यात्रेत मनसे नेते बाळा नांदगावकरांनी घेतला सहभाग

**दैनिक आपला विदर्भ**

**दारव्हा/प्रतिनिधी :**‘कोरा ७/१२ ही पायी यात्रा आज चौथ्या दिवशी लाखखिंड येथे पोहोचली असताना, या आंदोलनास महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब नांदगावकर यांनी ठाम पाठिंबा जाहीर केला. लाखखिंड येथील भव्य शेतकरी सभेमध्ये त्यांनी स्वतः उपस्थित राहून बच्चू कडू यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या लढ्याला सक्रिय पाठिंबा दिला.

नांदगावकर यांनी आपल्या भाषणात स्पष्ट शब्दांत सांगितले की, “ही केवळ एका भागाची नाही, तर संपूर्ण महाराष्ट्रातील शेती आणि शेतकऱ्यांच्या न्यायाची लढाई आहे. हा आवाज सरकारला ऐकावा लागेल.”

बाळासाहेब नांदगावकर यांच्यासोबत मनसेचे राज्य उपाध्यक्ष आनंदभाऊ यंबडवार, यवतमाळ जिल्हाध्यक्ष देवाभाऊ शिवरामवार, अनिल हमदापुरे,मनविसे जिल्हाध्यक्ष अभिजित नानवटकर,दारव्हा तालुकाध्यक्ष लाला पांडे, रणजित झोंबाडे, ईश्वर राठोड तसेच मनसेचे अनेक कार्यकर्तेही उपस्थित होते. त्यांच्यासह त्यांनी यात्रेच्या प्रमुख मागण्यांना पाठिंबा दर्शवत सहभाग घेतला.

लाखखिंड येथे झालेल्या या सभेत शेतकऱ्यांची तात्काळ कर्जमाफी, सक्तीची वसुली थांबवणे, शेतकरी आत्महत्यांना आळा, विधवा व अपंगांसाठी रोजगार योजना, मनरेगा कामांचा विस्तार, तरुणांसाठी शिक्षण व स्वयंरोजगाराच्या संधी यासारख्या मुद्द्यांवर ठाम भूमिका घेण्यात आली.

यात्रेचा हा टप्पा विशेष महत्त्वाचा मानला जात आहे, कारण यामध्ये आता राजकीय पातळीवरूनही जाहीर पाठिंबा मिळू लागला आहे. बाळासाहेब नांदगावकर यांचा सहभाग यात्रेतील कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरला असून, शेतकरी चळवळीला नवे बळ मिळाले आहे.

लाखखिंड नंतर ही यात्रा दिग्रस तालुक्यात प्रवेश करणार असून, पुढील ठिकाणीही संवाद व सभा आयोजीत केल्या जाणार आहेत.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने दत्तात्रेय प्रभुच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकाची क्रूझर गाडी १०० फुट दरीत कोसळली



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** उमरखेड तालुक्यातील आंबाळी येथे दूर दुरून भावी भक्त दरवर्षी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने दत्तात्रेय प्रभु संस्थान, आंबाळी येथे दर्शनासाठी येत असतात. यावर्षी सुद्धा आंबाळी येथील दत्तात्रेय प्रभु संस्थान येथे दत्तात्रेय प्रभु च्या दर्शनासाठी येत असताना तीन भाविकाची क्रूझर गाडी (क्रमांक -२२ ७६१३) सुमारे १०० फूट खोल दरीत कोसळली. दरीत कोसळताना गाडीने दोन ते तीन झाडे उडवत खाली झेप घेतली, मात्र दैव बलवत्तर म्हणून की काय, या भीषण अपघातात कुणालाही दुखापत झाली नाही. तिघेही प्रवासी सुखरूप असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

गाडीचा अपघात हा गाडीच्या वेगामुळे आणि रस्त्यालगत संरक्षणाची व्यवस्था नसल्यामुळे झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

### विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक संपन्न; पावसाळी अधिवेशनाचे १८ जुलैपर्यत कामकाज

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानमंडळाचे पावसाळी अधिवेशन कामकाज १८ जुलैपर्यंत होणार आहे. अधिवेशन कामकाजाच्या नियोजनासाठी आज विधानभवन येथे विधिमंडळ कामकाज सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीस विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, तसेच सदस्य भास्कर जाधव, नितीन राऊत, जितेंद्र आव्हाड, अमीन पटेल, भाई जगताप, प्रविण दरेकर, प्रसाद लाड व संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत पावसाळी अधिवेशनातील कामकाजाची रूपरेषा, चर्चा आणि शासकीय विधेयकांच्या मांडणीसंदर्भातील नियोजनावर चर्चा झाली. विधिमंडळाचे सचिव जितेंद्र भोळे यांनी कामकाजासंदर्भात सविस्तर माहिती दिली.

### कल्याणमधील व्यापाऱ्याला वालधुनी पुलावर रात्रीच्या वेळेत लुटले

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याण मधील वालधुनी पुलावरून बुधवारी रात्री साडे नऊ वाजण्याच्या दरम्यान खडकपाडा येथे राहणारा एक व्यापारी आपल्या दुचाकीवरून जात होता. यावेळी या व्यापाऱ्याच्या पाठीम ागून एक हेल्मेटधारी दुचाकीस्वार पाठलाग करत आला. त्याने काही कळण्याच्या आत व्यापाऱ्याच्या गळ्यातील दोन लाख ४० हजार रूपये किमतीची सोन्याची साखळी हिसकावून पळ काढला.

गेल्या महिनाभरापासून कल्याण डोंबिवली शहरांच्या विविध भागात दुचाकीवरून येऊन पादचाऱ्यांच्या गळ्यातील सोन्याचा ऐवज लुटून नेण्याचे प्रकार वाढत चालले आहेत. त्यामुळे एक ठराविक टोळी हे प्रकार करत असल्याचा पोलिसांना संशय असून पोलिसांनी त्यांच्या अटकेसाठी जोरदार प्रयत्न सुरू केले आहेत. ज्येष्ठ नागरिक, महिला पुरूषांना हे चोरटे लक्ष्य करत आहेत. कल्याण पश्चिमेतील खडकपाडा भागात राजू आसरानी (६४) हे व्यापारी राहतात. रात्रीच्या वेळेत आपली दिवसभराची व्यापाराची उलाढाल पूर्ण करून तक्रारदार व्यापारी राजू आसरानी बुधवारी रात्री गणेशघाट वालधुनी नदी पुलावरून दुचाकीवरून घरी चालले होते. पुलावर पावसामुळे निसरडे झाले असल्याने राजू आसरानी यांनी दुचाकीचा वेग कमी ठेवला होता.

पुलावरून जात असताना अचानक व्यापारी आसरानी यांच्या पाठीमागून एक दुचाकी स्वार आला. त्याने डोक्यात हेल्मेट घातले होते. तो आपणास मागे टाकून पुढे जाईल असे राजू यांना वाटले. त्यांनी आपली दुचाकी थोडी बाजुला घेऊन पाठीमागून येत असलेल्या दुचाकी स्वाराला पुढची वाट करून दिली.

पाठीमागून येत असलेल्या दुचाकी स्वाराने अचानक आपली दुचाकी राजू आसरानी यांच्या दुचाकीच्या दिशेने नेऊन एका हाताने राजू यांच्या गळ्यातील होलो जंजीर कलाकृतीची जुन्या ठेवणीची दोन लाख ४० हजार रूपये किमतीची सोन्याची साखळी जोराने खेचली. आपल्या गळ्यातील सोनसाखळी खेचली जात आहे हे लक्षात येताच राजू यांनी दुचाकीचा वेग कमी केला.

दुचाकीच्या हॅन्डलचा एक हात सोडून चोरट्या दुचाकी

# गोपाळकाल्याने आषाढी यात्रेची सांगता, पालख्यांचा परतीचा प्रवास सुरु

दैनिक आपला विदर्भ





**पंढरपूर/प्रतिनिधी :** गोपाळकाला गोड झाला, गोपाळाने गोड केला या जयघोषात अवघी श्रीकृष्णनगरी म्हणजेच गोपाळपूरनगरी लाखो वारकऱ्यांच्या गजराने दुमदुमून गेली. ज्ञानेश्वर माऊली तुकारामाच्या गजरात गोपाळपूरात मानाच्या पालख्यांसह सर्व संताच्या पालख्या दाखल झाल्या आणि गोपाळकाला केल्यानंतर श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी विठ्ठल मंदीरात आल्या. मानाच्या पालख्याने श्री विठ्ठलाचे दर्शन घेतले आणि परतीचा प्रवास सुरु केला. पोर्णिमेच्या दिवशी परंपरेनुसार गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथे मानाची अंमळनेरकर महाराजांची दिंडी काल्याच्या उत्सवासाठी पहाटे ५.०० वाजता भगवान श्रीकृष्ण मंदिरात दाखल झाली. त्यानंतर भजन झाले. तर शेगावच्या श्री संत गजानन महाराज पालखीचे पहाटे ४.०० वाजता गोपाळपूरात आगमन झाले. पहाटेपासूनच एकामागोमाग एक अशा विविध सुमारे ४५० संतांच्या दिंड्या, पालख्या विठ्ठलनामाचा गजर करीत गोपाळपुरात दाखल झाल्या होत्या. सकाळी ९.०० च्या सुमारास जगदगुरु श्री संत तुकाराम महाराजांची तर १०.०० च्या सुमारास संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचे पालखी सोहळे गोपाळपुरात दाखल झाले. श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या तसेच श्री तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन करण्यात आले. मंदिराजवळ पालख्या विसावल्या होत्या. या पालख्यासह संत सोपानकाका, संत मुक्ताबाई, संत नामदेव महाराज, संत गोरोबा, संत एकनाथ महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत निळोबाराय, चांगावटेश्वर देवस्थान यांच्यासह अन्य संतांच्या पालख्यांचे व दिड्यांचे गोपाळपुरात आगमन झाले. तत्पुर्वी गोपाळपुर येथील श्रीकृष्ण मंदीरात पहाटे २.३० वाजता विश्वस्तांच्या हस्ते पूजा करण्यात आली. पूजा झाल्यानंतर पहाटे ३.३० वाजता श्रीकृष्ण मंदीर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रध्देने श्री गोपाळकृष्णाचे दर्शन घेऊन मंदिराला प्रदक्षिणा घातली तसेच एकमेकांना प्रेमाने लाह्यांचा काला भरवून गळाभेट घेतली. श्रीकृष्ण मंदिर समितीच्या वतीने प्रसाद म्हणून लाह्यांच्या काल्याचे वाटप करण्यात आले. गोपाळपूर ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच उज्वला बनसोडे, ग्रामसेविका ज्योती पाटील तसेच ग्रामपंचायत सदस्य यांनी पालख्यांचे व दिड्यांचे स्वागत केले. गोपाळपूर ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छ पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था, हिरकणी कक्ष, प्लॅस्टिक संकलन केंद्र, तात्पुरते शौचालय, निवारा शेड,आरोग्य कक्ष आदी सुविधा वारकरी भाविकांसाठी उपलब्ध केल्या होत्या. यावेळी पोलीस प्रशासनाच्या वतीनेही चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या सोहळ्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर, प्रांताधिकारी सचिन इथापे,उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगोटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, यांच्यासह संबंधित अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. गोपाळपूर येथील गोपाळ कृष्ण मंदीर समितीच्या वतीने मंदिरात आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांचा सत्कार गोपाळ कृष्ण मंदिर समितीच्या वतीने गोपाळ कृष्ण मंदिर समितीचे अध्यक्ष दिलीप गुरव यांच्या हस्ते करण्यात आला. मंदीर समितीच्या वतीने पादुकांचे पुजन व मानाच्या पालख्यांचे मानकरी यांचे उपरणे,श्रीफळ व हार देवून सत्कार केला. यावेळी मंदिर समितीचे सदस्य शकुंतलाताई नडगिरे, संभाजी शिंदे, ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगांवकर, ॲड. माधवीताई निगडे, ह.भ.प.प्रकाश जवंजाळ, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ तसेच मानाचे पालख्यांचे पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्त उपस्थित होते. जातो माघारी पंढरीनाथा। तुझे दर्शन झाले आता ।। म्हणत जड अंत:करणाने संताच्या पालख्यांनी व वारकऱ्यांनी परतीचा प्रवास सुरु केला.

#### संत-देव भेटीचा सोहळा

गोपाळकाला झाल्यानंतर सर्व मानाच्या पालख्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दाखल झाल्या व सर्व संताच्या पादुका विठ्ठल दर्शनासाठी नेण्यात आल्या.यावेळी देवाची आणि संताची अनुपम भेट घडवून आणण्यात आली. श्री विठ्ठल-रुक्मणि मातेचे दर्शन घेतल्यावर हा संतदेव भेटीचा सोहळा पार पडला. यानंतर पालख्या परतीच्या मार्गावर रवाना झाल्या. तत्पूर्वी सकाळी ६.०० वाजता श्री.संत एकनाथ महाराजांच्या दिंडीचा काला संपन्न झाला. त्यानंतर श्री.संत निवृत्तीनाथ महाराज संस्थान त्र्यंबकेश्वर, श्री.संत चांगावटेश्वर देवस्थान सासवड, श्री.संत सोपानदेव महाराज संस्थान सासवड, श्री.संत मुक्ताबाई संस्थान मुक्ताईनगर, श्री.संत निळोबाराय संस्थान पिंपळनेर, श्री.विठ्ठल रूख्माई संस्थान कौंडण्यपूर, श्री.संत तुकाराम महाराज संस्थान देहू, श्री.संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान आळंदी, श्री.संत नामदेव महाराज संस्थान पंढरपूर या संतांचा देव भेटीचा सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात पार पाडला.

#### बुधवारी प्रक्षाळपूजा

पंढरपूर येथील आषाढी यात्रेत भाविकांना दर्शन देण्यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणीमाता अहोरात्र उभे असतात.या कालावधीत देवाचे नित्योपचार बंद असतात. श्री विठ्ठलाचे नवरात्र असल्याने पलंग काढण्यात आलेला असतो. त्यामुळे बुधवार (ता.१६) श्रींची प्रक्षाळपूजा करण्यात येणार आहे, अशी माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

## तालुका कृषी अधिकारी कार्यालयात पिक विमा सप्ताह उत्साहात साजरा

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे




**महार चिकना :** लोणार तालुका कृषी अधिकारी कार्यालयात दिनांक १ ते७ जुलै रोजी भारतीय कृषी विमा कंपनी यांच्या कडून पिक विमा सप्ताह निमित्त मंडळ कृषी अधिकारी श्री कावरखे साहेब यांच्या हस्ते पिक विमा बॅनरचे अनावरण करून खरीप हंगाम २०२५ च्या प्रचार प्रसिध्दी सुरुवात करण्यात आली. तसेच तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी होऊन योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन मंडळ कृषी अधिकारी श्री कावरखे साहेब यांनी केले. यावेळी उपस्थित उप कृषी अधिकारी श्री चाटे साहेब व सहाय्यक कृषी अधिकारी श्री टेकाळे साहेब श्री कदम साहेब, विशाल बुरेवार व भारतीय कृषी विमा कंपनी तालुका समन्वयक सचिन पेवकर, अमोल चव्हाण,अक्षय पेवकर उपस्थित होते

## तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप



**बिबी:** बीबी पोलीस स्टेशन हद्दीतील कुंबेफळ तालुका सिंदखेडराजा येथील एका तरुणाने झाडाला गळफास घेऊन आपली जीवन यात्रा संपवली असल्याची घटना ९ जुलै रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास घडली. मयत निलेश प्रकाश चव्हाण वय ३० वर्ष राहणार कुंबेफळ असे मृतकाचे नाव आहे. मयत निलेश याने बीबी शेत शिवारात उंबर मळा नावाचे शेतातील नाल्याच्या काठावर असलेल्या कव्हाचे झाडाचे फांदीला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. मृतकाने आत्महत्या करण्या अगोदर आईला फोन करून मी फाशी घेत आहे असे सांगितले. यावेळी आईने ताबडतोब घरातील लोकांना तसेच नातेवाईकांना सांगून ताबडतोब शोधा शोध करण्यास सुरुवात केली असता एका शेतातील झाडाला गळफास घेऊन लटकलेल्या अवस्थेत दिसला असता ताबडतोब नातेवाईकांनी बीबी येथे ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आणले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. असे फिर्यादी रोशन रमेश चव्हाण याने दिलेल्या तोंडी रिपोर्ट वरून सदरचा मर्ग दाखल करून तपास पंचनामा करून त्यानंतर मृतदेहाचे सेवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. मात्र निलेश प्रकाश चव्हाण यांनी आत्महत्या का केली याचे कारण अद्याप कळू शकले नाही. पुढील तपास बीबी पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांच्या आदेशाने तपास अधिकारी दिनेश चव्हाण हे करीत आहेत.

## शहापूरमधील शाळेत विद्यार्थिनींना विवस्त्र केल्याप्रकरणी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली गंभीर दखल

### विद्यार्थिनींचा छळ म्हणजे संवेदनहिनतेचं भयंकर उदाहरण : डॉ. नीलम गोऱ्हे

दैनिक आपला विदर्भ

■ उदय नरे



**ठाणे :** शहापूर येथील एका इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थिनींची मासिक पाळी तपासण्याच्या बहाण्याने विवस्त्र करून छळ केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून, या प्रकारावर विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला आहे. "ही घटना म्हणजे संवेदनहिनतेचं भयंकर उदाहरण असून, अशा कृत्यांना पूर्णपणे पाठीशी घालता येणार नाही," असे त्यांनी स्पष्ट केले.

८ जुलै रोजी घडलेल्या या घटनेत शाळेतील मुख्यध्यापिका, पाच शिक्षिका, दोन महिला कर्मचारी आणि एका शिपायावर पॉक्सो कायदा तसेच कलम ७४ आणि ७६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाथरूममध्ये सापडलेल्या रक्ताच्या डागांचे फोटो प्रोजेक्टरवर दाखवत विद्यार्थिनींची खुलेआम मासिक पाळीबाबत विचारणा करण्यात आली. ज्या मुलींना मासिक पाळी आली नव्हती, त्यांना जबरदस्तीने कपडे उतरवून तपासण्यात आल्याचा आरोप पालकांनी केल्याने ही घटना उघडकीस आली.

या गंभीर प्रकरणी डॉ. गोऱ्हे यांनी ठाण्याचे जिल्हाधिकारी यांच्याशी तातडीने संपर्क साधून माहिती घेतली. त्यांनी सांगितले की, गुन्हा रजिस्टर नंबर २११/२०२५ अन्वये दाखल करण्यात आलेला आहे. "शिक्षण संस्थेमध्ये अशा प्रकारचा अमानवी वागणूक दिली जाणं हा अत्यंत गंभीर विषय आहे. मी शिक्षण मंत्र्यांकडे तसेच संबंधित विभागांकडे मुलींना आरोग्यविषयक वैज्ञानिक माहिती आणि संवेदनशीलता पूर्वक शिकवली जावी, अशी मागणी केली आहे," असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

याचप्रमाणे सांगलीतील एका अल्पवयीन मुलीने चार मुलांकडून सतत होणाऱ्या मानसिक त्रासामुळे आत्महत्या केल्याच्या घटनेबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली. "मी सांगलीच्या पोलीस अधीक्षकांशी बोलले असून, चारी आरोपींना अटक करण्यात आली आहे. मात्र अशा घटना टाळण्यासाठी विद्यार्थिनींनी ११२ क्रमांकावर तातडीने मदत मागावी, अथवा आमच्याशी थेट संपर्क साधावा, असे माझे आवाहन आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

"आपण मुलींना समजून घेणाऱ्या, त्यांना आधार देणाऱ्या आणि त्यांचं मनोबल वाढवणाऱ्या शिक्षण व्यवस्थेकडे वळण्याची गरज आहे. हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर सामाजिक जागृतीचाही आहे," असे उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ठामपणे सांगितले.

## महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय संचालकपदी निवड झाल्याबद्दल हिंगणकर यांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ



**मालेगाव/प्रतिनिधी :** अकोला-वाशीम सहकारी बोर्डाचे ज्येष्ठ संचालक नानासाहेब हिंगणकर यांची महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय संचालकपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा अकोला-वाशीम सहकारी बोर्डाचे संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. दि प्रिमिअर को ऑपरेटिव्ह प्रिंटर्स लि. पुणेच्या (महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय) संचालक मंडळाच्या सन २०२५ ते २०३० या पंचवार्षिक निवडणुकीत अकोला जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते बोर्डाचे संचालक नानासाहेब हिंगणकर यांची अविरोध निवड झाल्याबद्दल अकोला-वाशीम जिल्हा सहकारी बोर्डाच्या झालेल्या मिटिंगमध्ये हिंगणकर यांचा सत्कार शाल व पुष्पगुच्छ देवून करण्यात आला. यावेळी बोर्डाचे अध्यक्ष विवेक हिवरे, उपाध्यक्ष दामोदर गोटे, वाशीम संचालक प्रकाश पाटील कुटे, अनिल जाधव अमानी, प्रभाकर राऊत, भारतीताई गावंडे,उमेश ठाकरे, मोतीराम ठाकरे, सुभाष ठाकरे, प्रवीण गोपनारायण, मोहन पडोळे, नंदकिशोर निलकंठ, सहकार विकास अधिकारी कांबे यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय नेते शरद पवार व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व अंकुश काकडे यांच्या पुढाकाराने या संस्थेच्या संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक पार पडली होती. पुणे येथे सन १९७५ ला मुद्रालायचे उद्घाटन भारताचे परराष्ट्रमंत्री स्व. वसंतराव चव्हाण यांच्याहस्ते व राज्याचे मुख्यमंत्री स्व. शंकरराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले होते. असा उज्वल वारसा जोपासत ही संस्था नावारूपास आली आहे.या संस्थेचे संचालक म्हणून माजी मंत्री स्व. नानासाहेब सपकाळ, सहकार महर्षी स्व. अण्णासाहेब कोरपे, महादेवराव भोईभार, संतोष कोरपे यांनी प्रतिनिधी केले आहे.तर, रमेश हिंगणकर यांना परत या संस्थेवर संचालक म्हणून निवड करण्यात आल्यामुळे यांचा सत्कार करण्यात आला आहे.

## विविध वृत्त...

### उबाठा च्या कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ



**रिसोड/प्रतिनिधी :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक निमीत्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कर्यकर्ता मेळाव्याचे आयोजन दिनांक १२ जुलै २०२५ शनिवारला पश्चिम विदर्भाचे संपर्कप्रमुख शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत यांच्या मार्गदर्शनात तसेच वाशिम लोकसभेचे खासदार संजय देशमुख व जिल्हा संपर्कप्रमुख दिलीप जाधव यांच्या उपस्थितीत करण्यात आले आहे.

वाशिम लोकसभेचे खासदार संजय देशमुख यांच्या वाशीम येथील काटा रोडवर जनसंपर्क कार्यालयाचे सुद्धा उद्धाटन होणार आहे सदर कार्यक्रमास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा सहसंपर्कप्रमुख डॉक्टर सुधीर कव्हर जिल्हाप्रमुख सुरेश मापारी जिल्हा संघटक गजानन देशमुख जिल्हा समन्वयक डॉक्टर सिद्धार्थ देवळे लोकसभा संघटक कॅप्टन प्रशांत सुर्वे रिसोड विधानसभा सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप उपजिल्हाप्रमुख डॉक्टर चंद्रशेखर देशमुख तालुकाप्रमुख नारायण अरु यासह जिल्ह्यातील आजी-माजी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत सदर कार्यक्रमाचे आयोजन वाशिम जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने करण्यात आले असून रिसोड तालुक्यातील सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान उबाठाचे तालुका समन्वयक मापारी यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे केले आहे.

### ज्येष्ठ नागरिकांसाठी केंद्र सरकारची विश्वासार्ह टोल-फ्री राष्ट्रीय हेल्पलाइन सेवा

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** वृद्धत्वाच्या वाटेवर चालताना अनेकांना आधाराची गरज असते. याच गरजेची जाणीव ठेवून भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सबलीकरण मंत्रालयामार्फत 'एल्डर लाईन १४५६७' ही राष्ट्रीय टोल-फ्री हेल्पलाईन देशभरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू करण्यात आली आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश भारतातील ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारी आणि अडचणी यांचे निवारण करणे, त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांपासून त्यांना संरक्षण देणे, आणि त्यांच्या जीवनात एक सकारात्मक बदल घडवून आणणे हाच आहे.

महाराष्ट्र राज्यात ही सेवा राष्ट्रीय समाज रक्षा संस्थान (), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन आणि जनसेवा फौंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने प्रभावीपणे कार्यान्वित करण्यात आली आहे. महाराष्ट्रात ही सेवा 'जनसेवा फौंडेशन' चालवत असून, ज्येष्ठांच्या गरजांना संवेदनशीलतेने प्रतिसाद देण्याचा प्रामाणिक प्रयत्न यामागे आहे.

ही हेल्पलाइन सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत कार्यरत असून, वृद्धांची काळजी, सल्ला, मार्गदर्शन, तक्रारींचे निवारण अशा अनेक सेवा एका फोन कॉलवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

ज्येष्ठांच्या आत्मसन्मानासोबतच त्यांच्या सुरक्षित, सन्मानजनक आणि सशक्त जीवनासाठी 'एल्डर लाईन १४५६७' हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

हेल्पलाईन क्रमांक: १४५६७ (टोल-फ्री)
सेवेची वेळ: रोज सकाळी ८ ते रात्री ८

### भायखळा येथील हत्येच्या तपासासाठी 'एसआयटी' स्थापन करणार- गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम



**मुंबई/प्रतिनिधी :** भायखळा येथे राजकीय वर्चस्व वादातून हत्याप्रकरणी सहा आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या आरोपींची संघटीत गुन्हेगारी टोळी असल्याचे निष्पन्न होत असल्याने, गुन्ह्यात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार (मोकोका) कारवाई करण्यात आली आहे. सखोल तपासासाठी 'एसआयटी' स्थापन करण्यात येईल, असे गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य पंकज भुजबळ यांनी लक्षवेधीद्वारे प्रश्न विचारला होता. यावेळी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, सदस्य शशिकांत शिंदे, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड यांनी चर्चेत सहभाग घेतला होता

गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्ह्याचा तपास भायखळा पोलीस ठाणे यांनी केला असून त्यात ६ आरोपींना अटक केली आहे. हत्या झालेल्या व्यक्तीच्या नातेवाईकांनी काही जणांचा गुन्हयात सहभाग असल्याचा व त्यांच्या राजकीय वर्चस्ववादातून हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. या प्रकरणी त्याअनुषंगाने सखोल तपासात आतापर्यंत संशय व्यक्त करण्यात आलेल्या व्यक्तींचा खुनाच्या कटात कोणताही सहभाग दिसून आला नाही असे राज्यमंत्री कदम यांनी सांगितले.

# आमदार सिद्धार्थ खरात शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सभागृहात आक्रमक

➤ शेतकरी समृद्ध करण्यासाठी शाश्वत योजना राबवण्याची मागणी

➤ शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत देण्यासाठी प्रश्न उपस्थित

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** नैसर्गिक संकटाने शेतकरी हतबल झाला असताना मायबाप शासनही शेतकऱ्यांची थट्टा करीत आहे. शेतकऱ्यांना संकटकाळात मदत करण्याऐवजी महायुतीचे सरकार केवळ तुटपुंजी मदत करून शब्दाचे बहर उधळत आहेत. तर, प्रत्यक्षात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले आहे. शेतकऱ्याचा वाली सध्या कोणीही नाही. अशी टीका आमदार सिद्धार्थ खरात यांनी करून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी. त्याचबरोबर खरडून गेलेल्या जमिनी ला मदत देण्यासाठी स्वतंत्र पॅकेज जाहीर करावे आणि शेतकऱ्यांना विना आठ तात्काळ मदत करावी, यासाठी आक्रमक भूमिका घेत सभागृहाचे लक्ष वेधले. आमदार सिद्धार्थ खरात यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांना सभागृहाची लक्ष वेधून ही दुनिया पाषाणाची बोलून बदलली नाही....बहर येथे शब्दाचे नुसतेच उधळले होते. ह्या ओवी गाऊन सत्ताधाऱ्यांचे बेगडी प्रेम उघड पाडले.

यावेळी ते म्हणाले की, महाराष्ट्रात ५२ टक्के जनता ही ग्रामीण भाग गातील आहे.आणि शेतीशी निगडित आहे. एक मार्च ते जुलै पर्यंत तब्बल ३६७ आत्महत्या झाल्या आहेत. शेतकऱ्यांच्या विकासासाठी कोणत्याही शाश्वत स्वरूपाच्या योजना न दिल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. सोयाबीनला ४८०० हमीभाव जाहीर केला होता. आणि सहा हजार रुपये भावाने खरेदी करण्याचे आश्वासन सत्ताधाऱ्यांनी निवडणूक काळात दिले होते. त्यानंतर भाव फरक योजनानुसार शेतकऱ्यांना मदत करण्याचे आश्वासने दिले होते.मात्र, आज रोजी सोयाबीन केवळ ४ हजार रुपये क्विंटल या दराने विकली जात आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या प्रचंड डबघाईस आला आहे. शेती क्षेत्रातील रोजगार ६० ते ६५ टक्के आहे. शेतीवर तब्बल सात कोटी पेक्षा जास्त जनता शेतीवर अवलंबून आहे. विदर्भ, मराठवाडा, खानदेश येथील शेतकरी हा पुरता हदबल झाला आहे. या भागात शेतीपूरक व्यवसाय नसल्याने शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. या भागातील नगरपालिका सुद्धा शेतीवर अवलंबून आहेत.

मात्र शेतकऱ्यांच्या विकासासाठी कोणत्याही शाश्वत योजना शासनाने न दिल्यामुळे शेतकऱ्यांवर आज रोजी आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. शेतकरी समृद्ध करायचा




असेल तर, शेतकऱ्यांना शेतीपूरक व्यवसाय सुरू करून देण्याची गरज आहे. त्याचबरोबर शाश्वत योजना राबवण्याचे सुद्धा गरज आहे शेतकऱ्यांच्या घरी दूध संकलन किंवा दुग्ध व्यवसाय सुरू झाले तर त्यांचा दैनंदिन खर्च भागेल आणि त्यांना आर्थिक दृष्ट्या मदत होईल.

विदर्भ, मराठवाडा, खानदेश या भागातील शेतकरी हे शेतीपूरक व्यवसाय नसल्याने आत्महत्या करीत आहेत. तर पश्चिम महाराष्ट्रात दूध संकलन केंद्र व प्रत्येकाच्या शेतकऱ्यांच्या घरी दुग्ध व्यवसाय आहेत. मात्र, विदर्भात व इतर महाराष्ट्रात हे व्यवसाय नाहीत. त्यामुळे शेतकरी हातबल झाला आहे. शेतकऱ्यांच्या संकटात नैसर्गिक आपत्तीने अधिकच वाढ केली आहे माझा मतदारसंघ असलेल्या मेहकर, लोणार, तालुक्यासह सिंदखेड राजा, चिखली या तालुक्यांमध्ये २५ व २६ जून रोजी झालेल्या अतिवृष्टीने शेतकरी उध्वस्त झाला आहे. मागील ५० वर्षात कधीच असा पाऊस झाला नाही.

अवघ्या १८ तासात पडलेल्या पावसाने नदीनाले, उपनद्या ह्या तुडुंब भरून वाहिल्या आहेत. पेरणी केलेले पिके वाहून गेली. तर, जमिनीतील सुपीक माती ही खरडून गेल्याने शेतशिवाराला वाळवंटाचे रूप आले आहे. पुढील पाच वर्षे जमीन कसन्या योग्य राहिली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत द्यावी. त्याचबरोबर खरडून गेलेल्या शेतीबाबत विशेष पॅकेज जाहीर करावे.ऑगस्ट २०२२ मध्ये अजित पवार यांनी शेतकऱ्यांना प्रति एकर ७५ हजार रुपयांची मदत देण्याची मागणी केली होती. आता मात्र, शेतकऱ्यांना प्रत्यक्षात २३ हजार रुपये हेक्टरी मदत दिली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना थट्टा मांडली की काय असा प्रश्न उपस्थित होत आहे. शेतकऱ्यांना किमान ५० हजार रुपये तरी हेक्टरी आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी सभागृहात लावून धरून शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत शासनाचे लक्ष वेधले.

त्याचबरोबर पिक विमा संदर्भात शेतकऱ्यांचे आर्थिक लुट सुरू आहे. गतवर्षी एक रुपयात असणारा पिक विमा यावर्षी मात्र अकराशे रुपये भरून काढावा लागत आहे. ही सुद्धा शेतकऱ्यांची लुट असल्याचा आरोप करीत शेतकऱ्यांच्या या प्रश्नाबाबत लक्ष वेधून तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली व शेतकरी समृद्ध करण्यासाठी शेतीला जोडधंदा म्हणून दुधाळ जनावरे देऊन दुग्ध व्यवसाय घराघरात सुरू करण्यासाठी पुढाकार घेण्याची मागणी केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आमदार सिद्धार्थ खरात यांनी आक्रमक पवित्र घेत सभाग सभागृहाचे लक्ष वेधले आमदार सिद्धार्थ खरात यांच्या या आक्रमक भूमिकेचे मात्र सर्वत्र कौतुक होत असून गेल्या पन्नास वर्षातही आमदार सिद्धार्थ खरात यांच्यासारखे मुद्देसूद मांडणी मतदारसंघातून कोणी केली नसल्याची चर्चा जनता करीत आहे.

### रिअल कपल प्रिया बापट आणि उमेश कामत आता 'बिन लग्नाची गोष्ट'मध्ये दिसणार रील कपल!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रिया बापट आणि उमेश कामत ही मराठीतील लोकप्रिय जोडी 'आणि काय हवं!' या वेब सीरीजमुळं प्रेक्षकांच्या मनात घर करून बसली आहे. नवदांपत्याच्या नात्यातील गोंधळ, प्रेम आणि छोटेछोटे वाद-विवाद याचं वास्तवदर्शी चित्रण या सीरीजमधून पाहायला मिळतं. त्यांच्या सहजसुंदर अभिनयामुळं आणि प्रिया-उमेश यांच्या केमिस्ट्रीनं या कथेला एक विशेष उंची दिली आहे. आता हे रिअल कपल 'बिन लग्नाची गोष्ट'मध्ये रील कपल म्हणून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत.

प्रिया बापट आणि उमेश कामत दिसणार एकत्र : मराठी चित्रसृष्टीतील सर्वात दिलखुलास आणि लोकप्रिय जोड्यांपैकी एक असलेले प्रिया बापट आणि उमेश कामत तब्बल बारा वर्षांनंतर पुन्हा एकत्र येत आहेत. 'बिन लग्नाची गोष्ट' या आगामी चित्रपटाच्या निमित्तानं हे दोघं आपल्या चाहत्यांना नव्या स्वरूपात भेटणार आहेत. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाचं मोशन पोस्टर सोशल मीडियावर झळकलं. पोस्टरमध्ये उमेश पारंपरिक वेशभूषेत, डोक्यावर मुंडावळ्या बांधलेला आणि हातात हार घेत उभा असलेला दिसतो, तर प्रिया मात्र मिश्कील हसत, हाताची घडी घालून खंबीर आत्मविश्वासानं उभी आहे. या दृश्यातून असे सुचते की, लग्नाच्या चौकटीत बसणारं हे नातं नाही. या गोष्टीत नात्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे विवाहसंस्थेच्या रूढ चौकटींपलीकडे जाऊन एक नवा विचार मांडणारा. या चित्रपटाच्या निर्मितीची जबाबदारी सुनील बियानी, पवन मेहता आणि नितीन प्रकाश वैद्य यांनी सांभाळली आहे.

### संत नगरीत भक्तिरसाची उधळण; शेगावात गुरुपौर्णिमेला गर्दीचा शिखर

**बुलढाणा/प्रतिनिधी :** भारतीय संस्कृतीत गुरूंचे अनण्यसाधारण महत्व आहे. गुरूला ब्रम्हा, विष्णू, महेश या त्रिमूर्ती पेक्षा जास्त म हत्व देण्यात आले आहे. अशा गुरूचे गुरुपौर्णिमेला भक्त गण वंदन करतात, गुरु पौर्णिमेच्या पर्वावर संत गजानन महाराजांनाच आपला गुरु मानणाऱ्याविदर्भासह राज्यातील भाविकांची गुरूवारी विदर्भ पंढरी शेगाव मध्ये मांदियाळी झाली.

संत गजानन महाराजांचा दिवस गुरुवारीच यंदाची गुरु पौर्णिमा आल्याने हजारो भाविकाम ध्ये एक वेगळाच उत्साह दिसून आला. हजारो भाविकांचा मेळा, महाराजांच्या शिष्यानी फुलेलेले संत गजानन महाराज संस्थान मंदिर, समाधी स्थळाच्या दर्शनासाठी लागलेल्या दीर्घ रांगा, 'गण गण गणात बोते'' च्या गजराने दुमदूम णारा मंदिर परिसर, भाविकांनी फ ुललेले मंदिराकडे येणारे रस्ते असे गुरुवारी, संतनगरीचे चित्र होते.

नुकताच आषाढी एकादशी सोहळा पार पडला. या दिवशी लाखावार भाविकांनी शेगाव नगरीत हजेरी लावली आणि ते समाधी स्थळी नतमस्तक झाले.

मात्र तरीही जेमतेम पाच दिवसांच्या अंतराने हजारो भाविकांनी गुरु पौर्णिमा निमित्त गुरु चरणी लीन होण्यासाठी संत नगरीत हजेरी लावल्याचे दिसून आले.आज गुरुवारी सकाळ पासूनच भाविकांचे आगमन सुरु झाले. दुपारी बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भ आणि राज्यातील भाविक यांची गर्दी वाढली. यामुळे सकाळ च्या तुलनेत संस्थान मंदिर परिसरात दर्शनसाठी दीर्घ रांगा लागल्याचे चित्र होते. सकाळी अर्धा एक तासात होणारया दर्शनसाठी दीड दोन तास लागत होते.

# भूसंपादनाचा मोबदला देण्यासाठी आ. श्वेता महालेंचा विधीमंडळात लक्षवेधी

## मतदार संघातील शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**चिखली/प्रतिनिधी :** मतदार संघातील घाणमोड, मानमोड, पांढरदेव व देवदरी येथील भूसंपादनाचा मोबदला हा गुणांक १ नुसार कमी मिळत आहे. तो शासन नियमानुसार गुणांक २ नुसार अधिक देवून ग्रामस्थांना न्याय द्यावा, अशी मागणी मतदार संघाच्या आमदार श्वेता महाले पाटील यांनी १० जुलै रोजी विधिमंडळात औचित्याच्या मुद्द्याद्वारे उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले. चिखली मतदारसंघातील घाणमोड, मानमोड, पांढरदेव व देवदरी येथील पुनर्वसनाचा प्रश्न मागील १५ वर्षांपासून प्रलंबित आहे. भूसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करण्यासंदर्भात शासनाचे २६ मे २०१५ व ५ ऑक्टोबर २०२१ चे परिपत्रक आहे. ५ ऑक्टोबर २०२१ च्या सुधारित परिपत्रकानुसार नुसार गुणांक १ चे निकष असे आहेत. ज्या जमिनी राष्ट्रीय किंवा राज्य मार्गालगत




आहेत.नोंदणी महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य यांनी प्रसिद्ध केलेल्या दराच्या वार्षिक विवरणपत्रात विहीत केलेली विकास नियोजन क्षेत्रातील जमीन आणि प्रादेशिक नियोजन क्षेत्रातील बिगर कृषीदर असणारी जमीन. वरील प्रकारच्या जमिनींचा मोबदला गुणांक १ प्रमाणे देण्यात यावा,असे निर्देश आहेत.५ऑक्टोबर २०२१ च्या सुधारित शासन राजपत्रानुसार चिखली मतदारसंघातील घाणमोड, मानमोड व पांढरदेव येथील जमिनी वरीलपैकी कोणत्याही निकषात बसत नसतानाही भूसंपादनाचा मोबदला शेतकऱ्यांना देताना गुणांक १ नुसार देण्यात येत आहे. सन २०२३ मध्ये बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा प्रकल्पातील सिनगाव जहागीर (ता. देऊळगाव राजा) येथील लाभार्थ्यांना जमिनीचा मोबदला गुणांक २ नुसार देण्यात आला आहे.तसेच २०२४ मध्ये मौजे भालेगाव (ता. मेहकर) येथील लाभार्थ्यांना जमिनीचा मोबदला गुणांक २ नुसार देण्यात आला आहे. त्यामुळे चिखली मतदारसंघातील लाभार्थ्यांवर अन्याय होत आहे.त्यामुळे घाणमोड, मानमोड, पांढरदेव व देवदरी येथील भूसंपादनाचा मोबदला देत असताना भालेगाव व सिनगाव यांच्याप्रमाणे गुणांक २ नुसार देण्यात यावा,याबाबत संबधितांना आदेश देण्यात यावे, अशी मागणी यावेळी आमदार श्वेता महाले पाटील यांनी सभागृहात करून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी न्याय द्यावा, अशी मागणी केली.

### गुणांक २ नुसार असा मिळतो मोबदला

वाजवी भरपाई आणि पारदर्शकतेचा भूमी संपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसाहत कायदा, २०१३ नुसार गुणांक २ म्हणजे ग्रामीण भागातील संपादित जमिनीच्या बाजारमुल्याला २ ने गुणले जाते. ज्यामुळे मोबदल्याची रक्कम वाढते. या व्यतिरिक्त, सोलॅशियम आणि इतर फायदे मिळून एकूण मोबदला अधिक न्यायपूर्ण होतो, विशेषतः ग्रामीण भागातील लोकांना योग्य भरपाई मिळावी यासाठी ही तरतूद आहे.

# रिसोड तालुक्यातील ८० ग्रामपंचायतीचे आरक्षण घोषित

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** रिसोड तालुक्यातील ८० ग्रामपंचायतीचे आरक्षण घोषित करण्यात आले. यामध्ये ४० ठिकाणी महिलांना आरक्षण देण्यात आले असून सदर आरक्षण सोडत साठी दिनांक ९ जुलै रोजी रिसोड तहसील कार्यालयाच्या सभागृहामध्ये उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर यांच्या अध्यक्षतेखाली तथा तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर व नायब तहसीलदार जवादे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आरक्षण सोडत संपन्न झाली. या आरक्षण सोडतीसाठी रिसोड तालुक्यातील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य व अन्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते सदर आरक्षण सोडतीमध्ये

**सर्वसाधारण**

लिंगा कोतवाल, गणेशपुर मोठेगाव,देऊळगाव बंडा, मोहोजा इंगोले, कवठा खुर्द, केनवड, करडा, निजामपूर, मांडवा, बाळखेड,पिंपरखेड,येवती, मोरगवान, कोयाळी बु के, मांगुळ झनक, बिबखेडा.

**सर्वसाधारण स्त्री**

गोहगाव, वनोजा, शेलगाव राजगुरे, येवता, भर जहागीर, चिंचांबा पेन, गोभणी, आंचळ,नेतंसा, एकलासपूर, केशवनगर, आगरवाडी, वाघी खुर्द, जवळा,मांगवाडी, घोणसरवाडी, बेलखेड, गोवर्धन.

**अनुसूचित जाती**

हिवरा पेन, आसेगाव पेन, दापुरी खुर्द, किनखेडा, लोणी बु, घोटा, महागाव, हराळ,चिखली, चाकोली,

**अनुसूचित जाती महिला**

जोगेश्वरी, पेनबोरी, मोप, लोणी खुर्द, वडजी, गोंडाळा, पिंपरी सरह, सवड, नावली.

**नामाप्र**

व्याड ,नंधाना, रिठद, खडकी सदार,वाडी रायताळ, कंकरवाडी,चिंचांबाभर, करंजी,




लेहणी,पार्डी तिखे, कळमगव्हाण

**नामाप्र महिला**

कोयाळी बु , मोजाबंदी, पळसखेड, धोडप खुर्द,देगाव, भापूर जाम आढाव, बोरखेडी, कुकसा, कुऱ्हा शेलु खडसे,

**अनुसूचित जमाती**

कोयाळी खुर्द ,धोडप बु

**अनुसूचित जमाती महिला**

मसला पेन, वाकद